**श्री.अजयकुमार नष्टे, उपविभागीय अधिकारी, जत उपविभाग जत यांचे न्यायालयात....**

दुरध्वनी क्रं. 02344/246134 Email-sdojath5@gmail.com

क्र.आरटीएस/अपील/१०९/२०२३

दिनांक- ३१.०१.२०२५

**प्रति,**

१. शांताबाई महादेव चौगुले

२. बिरूदेव महादेव चौगुले

३. पांडूरंग महादेव चौगुले

सर्व रा. घोलेश्वर, ता.जत, जि. सांगली, .... **अपिलार्थी**

**विरुध्द**

१. सुलाबाई नारायण कोडलकर

२. वजाबाई कृष्णा गोयकर

३. अनुबाई जगन्नाथ बंडगर

४. पोपट जगन्नाथ बंडगर

५. सुनिल जगन्नाथ बंडगर

६. छाया दरिलिंग डोरले

७. राणी हणमंत बिरादार

अ.क्र.१ व २ रा. घोलेश्वर, ता.जत, जि.सांगली

अ.क्र.३ ते ७ रा. राजुरी ता.सांगोला जि.सोलापूर ...... **जाबदार**

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ प्रमाणे**

**निकालपत्र.**

**वाद मिळकतीचा तपशिल.**

| गांव | तालुका | गट नंबर | एकूण क्षेत्र | पैकी वादाचे क्षेत्र | वादाचा फेरफार |
|---|---|---|---|---|---|
| घोलेश्वर | जत | १७९ | ०० हे.७८ आर., पो.ख.०० हे. ०१ आर. | ०० हे. ४१ आर., पो.ख.०० हे.०० आर. | १४१६ |

मौजे घोलेश्वर, ता.जत येथील उक्त वाद मिळकतीसंदर्भात मंडळ अधिकारी, वळसंग यांनी फेरफार नंबर १४१६, प्रकरणी तक्रार-रजि.क्र.०८/२०२३, दिनांक ०९.०५.२०२३, अन्वये दिलेल्या आदेशावर व्यथित होऊन प्रस्तुत अपिलार्थी यांनी आरटीएस अपील दाखल केलेले आहे.

**प्रस्तुत अपिल प्रकरणी उभय पक्षकार यांना म्हणणे मांडणेसाठी रितसर नोटीसा देऊन सुनावणीसाठी पुरेशी संधी देण्यात आली.**

**अपिलार्थी यांनी त्यांचे लेखी युक्तीवादामध्ये सारांशरूपाने पुढीलप्रमाणे मुद्दे मांडले आहेत.**

१. जाबदार नं.३ ते ७ यांनी जाबदार नं.१ व २ यांना वाद मिळकत ही बेकायदेशीररित्या दस्त क्र.७६८/२०२३ ने दि.२१०२/२०२३ रोजी तथाकथित खरेदी दस्ताने विक्री केलेली आहे ती पुर्णता चुकीची व बेकायदेशीर आहे.

२. वाद मिळकतीबाबत जत येथील मे. दिवाणी न्यायालयात अपिलार्थी यांनी दि. २८/०१/२०१६ रोजी सरस-निरस मानाने वाटप होवुन मिळणेकरीता दावा व तुर्तातुर्त ताकिदीकरीता रे.दि.मु.नं. २५/२०१६ ने दाखल केलेला आहे. प्रस्तुत दाव्यामध्ये वाद मिळकतीचाही समावेश असुन जाबदार नं. ३ यांना प्रतिवादी नं.३ म्हणुन सामील आहेत.

३. अपिलार्थी यांनी जत येथील मे. दिवाणी न्यायालयात रे.दि.मु.नं. २५/२०१६ ने दाखल केलेल्या दाव्यामध्ये ग.नं. १७७, १७९, १४९, १८०,१७४ या मिळकतीचे सरस-निरस मानाने वाटप होवून कब्जा मिळणेसाठी दावा दाखल केलेला होता. सदर दावेचा अंतिम निकाल होईतोपर्यंत सदरील वाद मिळकतीची खरेदी विक्री, दान, गहान, बोजा, तबदिली स्वतः अगर अन्य इसमा तर्फे करु नये म्हणुन तुर्तातुर्त ताकिदीचा अर्जही दिलेला होता. प्रस्तुत दाव्याच्या नोटीस व समन्स प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी यांना बजावणी झाल्यानंतर प्रतिवादी यांनी वकिल नेमुन म्हणणे व कैफियत देणेकरीता मुदत मागण्यात येवुन प्रस्तुत दाव्यामध्ये हजर झालेले होते आज अखेर जाबादार यांनी मे दिवाणी न्यायालयात म्हणने दिलेले नाही.

४. अपिलार्थी यांनी यापूर्वीही या मे. न्यायालयात अपिल दाखल करुन ग.नं. १७७ मधील झालेल्या खरेदी दस्ताची नोंद मा. न्यायालयाने दिलेल्या स्थगितीच्या आदेशाप्रमाणे रदद्यातल करणेकरीता आर.टी.एस. अपिल नं.९/२०१९ ने दाखल करण्यात आलेले होते. त्याचा निकाल मा. उपविभागीय अधिकारीस, जत यांनी दि. १८/०८/२०२१ रोजी फेरफार नं.१०४७ ने रदद्बातल करणेबाबत आदेश दिलेला होता. त्यावरती मा. अप्पर जिल्हाधिकारीसो, सांगली यांचेकडे आर.टी.एस./दुसरे अपिल नं. १६५/२०२१ ने दाखल केलेले होते. त्याचाही निकाल दि.२६/०५/२०२३ रोजी यातील अपेलंट यांच्या बाजुने झालेला आहे. त्यामुळे मा. उपविभागीय अधिकारीसो, जत व अप्पर जिल्हाधिकारीसो सांगली यांनी मा.दिवाणी न्यायालय, जत यांनी रे.दि.मु.नं. २५/२०१६ चे कामी तुर्तातुर्त ताकिद अर्जावरती दि. २३/०६/२०१६ रोजी दिलेल्या आदेशाचे पालन केलेले असतानाही मा.मंडळ अधिकारी, वळसंग यांनी पालन केलेले दिसुन येत नसल्याने वाद मिळकतीचे झालेले तथाकथित बेकायदेशीर दस्तावरुन धरण्यात आलेला फेरफार नं. १४१६ ची नोंद मंजुर करणेबाबत दिलेला निर्णय रदद्वातल ठरवुन अपिलार्थी यांचे आपिल मंजूर करणेबाबत आदेश व्हावा.

५. जाबदार नं. १ व २ यांनी जाबदार नं. ३ ते ७ यांना वाद मिळकतीबाबत मे. दिवाणी न्यायालयात वाद चालू असुन त्यामध्ये स्थगितीचा आदेश असल्याची कल्पना असुनही जाबदार नं. १ ते ७ यांनी संगनमत करुन अपिलार्थी यांचा हिस्सा बुडविणेच्या दृष्ट हेतुने केलेला व्यवहार हा बेकायदेशीर असल्याने खालील मे, कोर्टाने तक्रार रजि.नं. ८/२०२३ वरती दि.०९/०५/२०२३ दिलेला असलेने वादातीत फेरफाराची नोंद रद्द करणेत यावी.

**जाबदार यांनी त्यांचे लेखी युक्तीवादामधील सारांशरूपाने पुढीलप्रमाणे मुद्दे मांडले आहेत.**

१. अपिलार्थी यांनी दाखल केलेले अपिल त्यासोबतचा स्थगिती अर्जातील मजकूर खोटा, चुकीचा, बेकायदेशीर असून तो जाबदार यांना मान्य व कबूल नाही. अपिलार्थी यांचे अपिलातील व स्थगिती अर्जातील जे जे विधाने जाबदार यांनी ना कबूल केलेली आहेत ते ते विधाने शाबीत करणेची जबाबदारी अपिलार्थी यांची राहील.

२. अपिलार्थी यांचा स्थगिती अर्ज पाहता तो तक्रार रजि. नं. ०८/२०२३ मधील निकाल व घोलेश्वर येथील फेरफार नं. १४१६ बाबत दाखल केले आहे. वास्तविक तक्रार रजि. नं. ०८/२०२३ मधील आदेश हा दि. ०९/०५/२०२३ रोजी झालेला असून त्यानंतर अपिलाच्या मुदतीनंतर म्हणजे दि. १०/०७/२०२३ रोजी सदर तक्रार रजि. नं. ०८/२०२३ च्या निकालावरुन फेरफार नं. १४१६ चा अंमल घोलेश्वर येथील गट नं. १७९ बाबतच्या खरेदी दस्ताचे नोंदीचा अंमल ७/१२ सदरी दिलेला आहे. या कारणाने सध्या अपिलार्थी यांच्या स्थगिती अर्जास कोणताही अर्थ अगर तथ्य राहत नाही.

३. मंडळ अधिकारी वळसंग यांनी तक्रार रजि.नं.०८/२०२३ च्या कामी समोर आलेले पुरावे व कागदपत्र यांचा कायद्यातील तरतुदींचा अभ्यास करुनच आदेश दिलेला असल्याने त्यामध्ये या मे.कोर्टाने हस्तक्षेप करणे जरुरीचे व कोणतेही कारण वाटत नाही.

४. अपिलार्थी यांनी रे.दि.मु.नं. २५/२०१६ चा दावा दाखल केले बाबत उल्लेख केलेला आहे तसेच त्या कामी मे.कोर्टाने तुर्तातुर्त ताकिद अर्ज केले असल्याचे नमूद केले आहे. अपिलार्थी यांनी अपिलासोबत दाखल केलेली रे.दि.मु.नं. २५/२०१६ मधील स्थगिती अर्ज पाहता त्यावर मे. दिवाणी कोर्टाने दि. २३/०६/२०१६ इ. रोजी आदेश केल्याचे दिसून येते. याउलट मयत धोंडीराम चौगुले व जगन्नाथ बंडगर यांच्यातील खरेदी दस्त क्र. ५९२/२०१६ चे खरेदी दस्त पाहता सदर खरेदीदस्त दि. १७/०२/२०१६ इ.रोजीचे आहे हे स्पष्ट दिसून येते. खरेदीदस्त व मे.दिवाणी न्यायालयाचा स्थगिती अर्जावरील आदेश यांच्या अवलोकन केले असता मे.दिवाणी न्यायालयाच्या आदेशा पुर्वीच खरेदी दस्त नोंद क्र. ५९२/२०१६ झालेला होता हे स्वयंस्पष्ट आहे.

५. जाबदार नं. ३ ते ७ यांनी जाबदार नं. १ व २ यांच्या अखत्यारीत अपिलात नमूद केलेल्या नोंदणीकृत दस्त क्र.७६८/२०२३ दि. २१/०२/२०२३ इ. रोजी खरेदीपत्र करुन दिले. सदर खरेदी दस्ताची नोंद गावकामगार तलाठी यांनी फेरफार नं. १४१६ ने धरली. त्याबाबत अपिलार्थी यांनी हरकत घेतल्यानंतर मंडळ अधिकारी वळसंग यांचे समोर तक्रार रजि. नं. ०८/२०२३ ने कामकाज चालले. त्या कामी अपिलार्थी व जाबदार यांनी आपले म्हणणे व पुरावे सादर केले होते.

६. जाबदार नं. ३ ते ७ यांनी जाबदार नं. १ व २ यांच्या आखत्यारीत करुन दिलेला खरेदी दस्त हा नोंदणी कृत असून नोंदणीकृत दस्ताची नोंद धरणे ही बाब कायदेशीर व बंधनकारक आहे. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १४९ व १५० प्रमाणे नोंदणीकृत दस्ताची नोंद ७/१२ सदरी कब्जेदार रकाण्यामध्ये अंमल देणे बंधनकारक असल्याने जाबदार यांच्यातील खरेदी दस्ताची नोंद फेरफार नं. १४१६ ने मंजूर करणेबाबत मंडळ अधिकारी वळसंग यांनी तक्रार रजि. नं. ०८/२०२३ मध्ये दिलेला आदेश योग्य व बरोबर आहे.

७. जाबदार यांच्यातील झालेले खरेदीदस्त हे अपिलार्थी यांनी रद्द बातल अथवा बेकायदेशीर असल्याचे जाहीर करुन घेतले नाही. अपिलार्थी यांनी अपिलात नमूद केलेली कथने व विधाने ही महसूल न्यायालयापुढे चालत नाहीत. अपिलार्थी हे मागत असलेली दाद ही पुर्णतः दिवाणी स्वरुपाची आहे अशी दाद महसूल न्यायालयाकडे मुळीच मागता येत नाही.

**अपिलार्थी यांनी प्रकरणी दाखल केलेला अपील मेमो, जाबदार यांचा लेखी युक्तीवाद प्रकरणी दाखल कागदपत्रे यांचे एकत्रित अवलोकन करता माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.**

१. मौजे घोलेश्वर, ता.जत येथील उक्त वाद मिळकतीसंदर्भात मंडळ अधिकारी, वळसंग यांनी फेरफार नंबर १४१६, प्रकरणी तक्रार-रजि.क्र.०८/२०२३, दिनांक ०९.०५.२०२३, अन्वये दिलेल्या आदेशावर व्यथित होऊन प्रस्तुत अपिलार्थी यांनी आरटीएस अपील दाखल केलेले आहे.

२. वाद मिळकत जाबदार १ व २ यांनी जाबदार ३ ते ७ यांचेकडून खरेदी घेतलेली आहे. प्रस्तूत प्रकरणी दाखल कागदपत्रांचे अवलोकन करता अपिलार्थी यांनी मा. दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर जत यांचेकडील दाखल रे.दि.मु.नं. २५/२०१६ मधील निशाणी २९ वरील आदेश पहाता मा.न्यायालयाने दावा मिळकत तबदिली करू नये म्हणून नये म्हणुन कैफीयत दाखल होईपर्यत तुर्तातुर्द ताकीद दिलेची दिसून येत आहे. अशी परिस्थिती असतांना मंडळ अधिकारी मांडग्याळ यांनी तक्रार-रजि.क्र.०८/२०२३, दिनांक ०९.०५.२०२३ प्रकरणी फेरफार क्र.१४१६ बाबत दिलेला निर्णय चुकीचा व बेकायदेशीर असल्याचे दिसून येत आहे.

३. मुलतः मा. न्यायालयाने निशाणी २९ वरील आदेश पहाता मा.न्यायालयाने दावा मिळकत तबदिली करू नये म्हणून कैफीयत दाखल होईपर्यत तुर्तातुर्द ताकीद दिलेची दिसून येत आहे. जरी कायदेशीर बाबींचे अवलोकन करता मा. दिवाणी न्यायालयाचे होणारे निर्णय हे सर्व हितसंबंधीत यांचेवर अंतीमतः बंधनकारक राहणार असले तरी, व त्यामुळे अधिकार अभिलेख सदरी जरी बदल होणार असले तरी, एखाद्या केस प्रकरणी दिलेला आदेश डावलने म्हणजेच कायदेशीर औचित्याचा भंग करणारे ठरते. त्यामुळे मा. न्यायालयाने दिलेला आदेश पहाता सद्यस्थितीत झालेल्या नोंदणीकृत दस्ताआधारे घेणेत आलेली फेरफार नंबर १४१६, ची नोंद मा. न्यायालयाच्या होणा-या अंतीम आदेशापावेतो रद्दबादल ठरविणे क्रमप्राप्त होणार असलेबाबतचे माझे मत झालेने, मी अजयकुमार नष्टे, उपविभागीय अधिकारी जत, उपविभाग जत पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

**निकालपत्रात नमूद कारणास्तव अपिलार्थी यांचे अपील मान्य करण्यात येत आहे. मंडळ अधिकारी वळसंग यांनी तक्रार-रजि.क्र.०८/२०२३, दिनांक ०९.०५.२०२३ रोजी दिलेला निर्णय रद्द करणेत येत आहे.**

खर्चासंबंधी कोणतेही आदेश नाहीत. सदर आदेशाची अंमलबजावणी अपील कालावधी नंतर करणेत यावी. सदर निकालाची समज सर्व संबंधीताना देणेत यावी.

प्रस्तुत निकालपत्र www.eqjcourts.gov.inया वेबसाईटवर पहाणेस उपलब्ध आहे.

ठिकाणी -जत
**दिनांक - ३१.०१.२०२५**

(अजयकुमार नष्टे )
**उपविभागीय अधिकारी**
**जत उपविभाग जत**

प्रत- तहसिलदार जत यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.